!! यशोगाथा.!!

नाव-: युवराज प्रकाश जाधव

पत्ता-: मु पो. कवठे पिरान ता. मिरज जि. सांगली

शिक्षण-: बी.ए.

खेळ-: खो-खो

माझे मूळ गाव कवठे पिरान,मिरज तालुक्यातील असून या ठिकाणी खेडेगावात असलेमुळे खेळासाठी पुरक वातावरण नसायचे शेतामधे काम करूण खो खो चा सराव करत होतो.

माझे प्राथमिक शिक्षण इ.१ ली ते इ.४ थी जिल्हा परिषद शाळा,कवठे पिरान, या ठिकाणी पूर्ण झाले. हे प्राथमिक शिक्षण घेत असताना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले कारण आम्ही खेडेगावात असल्यामुळे जास्त प्रमाणात आर्थिक परिस्थिती हालाकीची होती त्यामुळे आई-वडिलांना आपल्या मुलांना शिक्षण देणे फार कठीण झाले होते. त्या परिस्थितीतही शेतमजुरी करून आई-वडिलांनी आम्हाला शिकण्याची संधी दिली.

माझे पुढील शिक्षण इ.५ वी ते इ.१० वी हिंद केसरी मारुती माने विद्यालय कवठे पिरान, या ठिकाणी पूर्ण झाले तसेच १९९५ साली मी खो-खो हा खेळ खेळण्यास सुरुवात केली. आमचे हिंद केसरी स्पोटस् मधील सर्व मार्गदर्शक यांनी मी ग्राउंड वर खेळताना माझ्या अंगातील क्रीडा गुण ओळखून त्यांनी मला खो-खो या खेळाचे प्रशिक्षण देण्यास सुरुवात केली.इ. ४ थी ते इ. ७ वी या वर्गात शिकत असताना मी खो-खो खेळाचा सराव चांगल्या पद्धतीने करण्यास सुरुवात केली.

सन २००० साली १४ वर्ष वयोगटात खो-खो स्पर्धेमध्ये महाराष्ट्र संघाला प्रथम क्रमांक मिळवून दिला.

तसेच आजपर्यंत अनेक राष्ट्रीय खो-खो स्पर्धा खेळलो,त्यामध्ये प्रामुख्याने उल्लेख करावासा वाटतो तो सन २०११ साली नाशिक येथे झालेल्या ४८ वी पुरुष-महिला राज्य अजिंक्यपद खो-खो स्पर्धेचा. कधीही राज्य अजिंक्यपद स्पर्धा हरला नाही असा मुंबई संघ त्यांच्याबरोबर पहिल्यांदाच मला खेळण्याची संधी मिळाली आणि ती संधी मिळताच सांगली जिल्ह्यासाठी आम्ही ४८ वर्षानंतर फायनल जिंकण्याचा बहुमान मिळवला व त्या ठिकाणी मला सर्वोत्कृष्ट आक्रमक खेळाडू चा बहुमान मिळाला.ती आमच्यासाठी खो-खो क्षेत्रातील सर्वात मोठी कामगिरी होती. तसेच संभाजीनगर या ठिकाणी ४९ वी पुरुष-महिला राज्य अजिंक्यपद खो-खो स्पर्धेमध्ये **सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून "नॅनो कार बक्षिस" मिळालेली आहे**. तसेच त्या ठिकाणी राष्ट्रीय खो-खो स्पर्धेसाठी माझी तिसऱ्या सीनियर गटासाठी निवड झाली.

तसेच आजपर्यंत खालील स्पर्धा खेळलो

१ . २०१६ साली १ ली साऊथ एशियन गेमस् खो-खो स्पर्धा ( आसाम )
२. २० राष्ट्रीय खो-खो स्पर्धेमध्ये सहभाग.
३. नॅशनल गेम्स खो-खो स्पर्धा.सन-२०१० व सन-२०१५
४. अखिल भारतीय खो-खो विद्यापीठ स्पर्धा.
५. १५ राज्य स्तरावरील खो-खो स्पर्धा.

हिंद केसरी स्पोर्टस् कवठे पिरान हा माझा क्लब असून इथूनच माझे खो-खो चे धडे सुरू झाले. शालेय स्पर्धा खेळताना व क्लब स्पर्धेमध्ये सहभागी होताना माझ्या मंडळाचा खूप मोलाचा वाटा आहे. आमचा खेळ हा सांघिक खेळ असल्यामुळे सर्व खेळाडू एकत्र आल्यावर खेळला जातो,त्यामुळे माझ्याबरोबर सराव करणाऱ्या माझ्या मित्रांचाही माझ्या यशामध्ये मोलाचा वाटा आहे.

या स्पर्धेमध्ये सुवर्णपदक मिळवल्याबद्दल महाराष्ट्र सरकारने एक मोठा निर्णय घेतला.असे खेळाडू ज्यांनी महाराष्ट्राच्या क्रीडा क्षेत्राचे आणि देशाचे नाव मोठे केले आहे.अशा खेळाडूंना शासनाने डिसेंबर २०१८ रोजी शासन सेवेत -थेट नियुक्ती दिलेली आहे. आणि त्याचा मला सार्थ अभिमान आहे. मला अजून एक अभिमान वाटतो की मी एक खेळाडू आहे आणि क्रीडा विभागातच नोकरीसाठी मला महाराष्ट्र शासनाने संधी दिली ही खरोखरच उल्लेखनीय बाब आहे. कारण मी माझ्यासारखे अजून काही खेळाडू घडवून महाराष्ट्राला आणि या देशाला जास्तीत जास्त सुवर्णपदक मिळतील यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करीन तसेच मी महाराष्ट्र शासनाचे खूप खूप आभार मानतो.

मला मिळाले आजपर्यंतचे पुरस्कार.

१.महाराष्ट्र शासनाच्या शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार.
२.राजा स्वामी क्रीडा पुरस्कार.
३.सांगली जिल्हा क्रीडा पुरस्कार.
४.वसंतदादा जिल्हा क्रीडा पुरस्कार.
५. आर.आर.पाटील क्रीडा पुरस्कार.